# इतीवृत्तांत

कंत्राटी ग्रामसेवक सरळ सेवा भरती - २०११ जिल्हा परिषद नांदेड कडून जाहिरात दि. १४.०९.२०११ रोजी देण्यात आली. सदर जाहिरात दै.सामना (अ वर्ग) ,दै.गोदातीर समाचार (ब वर्ग) ,दै.प्रभाव (क वर्ग) व साप्ताहिक एकजूट (क वर्ग) वर्तमानपत्रात देवून प्रसिध्द करण्यात आली. त्यात सदरील पदासाठी अर्ज भरण्याची तारीख १५.०९.२०११ ते २६.०९.२०११ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर मा.आयुक्त औरंगाबाद यांच्या पत्रान्वये कृषी पदवी / कृषी पदवीका धारकांसाठी अर्ज करण्याची वाढीव तारीख ३०.०९.२०११ पर्यंत वाढवून दिल्याने दि.२७.०९.२०११ रोजी सुधारीत सुचना देण्यात आली.संबंधीतांचे अर्ज दि.३०.०९.२०११ पर्यंत स्वीकारण्यात आले.

## जागेचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | सर्वसाधारण |
| १ | अनु जाती | ३२ | १० | ५ | २ | १ | २ | ३ | ९ |
| २ | अनु जमाती | १८ | ५ | ३ | १ | ० | १ | २ | ६ |
| ३ | विजाअ | ७ | २ | १ | ० | ० | ० | १ | ३ |
| ४ | भजब | ८ | २ | १ | ० | ० | ० | १ | ४ |
| ५ | भजक | ९ | ३ | १ | ० | ० | ० | १ | ४ |
| ६ | भजड | ६ | २ | १ | ० | ० | ० | १ | २ |
| ७ | विमाप्र | ६ | १ | १ | ० | ० | ० | १ | २ |
| ८ | इमाव | ५६ | ८ | ८ | ३ | १ | ३ | ६ | १८ |
| ९ | खुला | १३१ | २० | २० | ७ | ३ | ७ | १३ | ४२ |
| एकुण | | २७३ | ८२ | ४१ | १३ | ५ | १३ | २९ | ९० |

उपरोक्त कालावधीत एकुण २६७३२ अर्ज प्राप्त झाले.त्यापैकि २५८२५ प्रत्यक्ष व ९०७ अर्ज on line व्दारे प्राप्त झाले.

वरील प्राप्त अर्जांपैकि १५८२५ अर्जांची computer data entry चे काम झेलटेक कं.पुणे यांच्या कडून व उर्वरीत १०००० अर्जांची computer data entry क्रिऐटीव्ह कॉम्पूटर नांदेड यांच्या कडून करण्यात आली. व लेखी परीक्षेस पात्र

उमेदवारांची प्रवर्ग निहाय यादी दि.११.१०.२०११ रोजी जिल्हा परिषदेच्या www.zpnanded.org व http/zpnanded.applyjobz.com संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली.प्रसिध्द केलेल्या यादीत काहि आक्षेप असल्यास उमेदवारांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे दि.१५.११.२०११ रोजी ०५.४५ वाजेपर्यंत लेखी स्वरूपात कळवावे.त्यान्वये एकुण ३५७ आक्षेप प्राप्त झाले.आक्षेप अर्ज संबंधीतांच्या कागदपत्राच्या तपासणीच्या अधीन राहून संबंधीतांना लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र जिल्हा परिषदे कडून प्रत्यक्ष देण्यात आले.दि.२०.१०.२०११ रोजी जाहिर सुचनेव्दारे प्राप्त आक्षेप सोडून लेखी परिक्षेचे प्रवेश पत्र वरील संकेत स्थळावर झेलटेक कं.पुणे यांच्या सहकार्याने उपलब्ध करून दिले.व उमेदवारांना प्रवेश पत्र पोष्ट टपालव्दारे पाठविण्यात आले. ज्या उमेदवारांना internet व्दारे प्रवेश पत्र दि.२१.१०.२०११ पर्यंत मिळाले नाही त्यांनी पंचायत विभाग जिल्हा परिषद नांदेड येथे प्रवेश पत्र देण्यात येतील असे सुचीत केले. क्रिऐटीव्ह कॉम्पूटर नांदेड यांच्या सहकार्याने ज्या उमेदवारांना प्रवेश पत्र मिळाले नाही त्यांना प्रत्यक्ष वाटप करण्यात आले. एकुण २००५४ उमेदवारांना प्रवेश पत्र internet वर उपलब्ध करून देण्यात आले.दि.२३.१०.२०११ रोजीच्या लेखी परीक्षेस १४३७६ उमेदवारांनी परीक्षा दिली. लेखी परीक्षेचा निकाल दि.२५.१०.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आला. दरम्यान शासनाचे दि.२१.१०.२०११ च्या पत्रानुसार भरतीची सर्व प्रक्रिया थांबून जिल्हा निवड समिती अध्यक्ष तथा मा.जिल्हाधिकारी महोदयांनी भरतीबाबतचे सर्व अभिलेखे सिल करण्याचे आदेश दिल्यानुसार अभिलेखे सिल करण्यात आले. व दि.२५.१०.२०११ रोजी जाहिर सुचनेव्दारे मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद च्या रिट याचिकेवरील निर्णयानंतर मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल असे सुचीत केले.

सदर भरती बाबत मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्रमांक ७१०२/२०११ चा निकाल जिल्हा परिषदेस प्राप्त झाल्यानंतर निकालातील आदेशानुसार मुलाखतीची प्रक्रिया चालु करण्यासंदर्भात जिल्हा निवड समिती अध्यक्ष तथा मा.जिल्हाधिकारी महोदयांच्या परवानगीने सिल केलेले अभिलेखे खुले करून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या कक्षेत सर्व अभिलेखे हस्तांतर करून पुढिल प्रक्रिया video shutting मध्ये चालु करण्यात आली.

लेखी परिक्षेच्या निकालानुसार मुलाखतीस पात्र ८६० उमेदवारांची यादी दि.०६.१२.२०११ रोजी जाहिर सुचनेव्दारे प्रसिध्द करण्यात आली. मुलाखतीचा दि.१२.१२.२०११ ते १९.१२.२०११ पर्यंत प्रवर्ग निहाय तारखा देण्यात येवून मुलाखती मा.जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे ठेवण्यात आल्या.प्रसिध्द

केलेल्या यादीतील आक्षेप अर्ज १२ आले.संबंधीतांना कागदपत्राच्या तपासणीच्या अधीन राहून मुलाखतीस पात्र करण्यात आले.असे एकुण ८७२ उमेदवारांना मुलाखतीस पात्र ठरविण्यात आले. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या सुचनेनूसार मुलाखतीस जे उमेदवार उपस्थित झाले नव्हते त्यांचे मुळ अर्ज तपासून अर्जावरील संपर्क नंबरवर दुरध्वणी करून संदेश पाठवावा. करीता अर्ज तपासले असता एकुण २३ जणांचे संपर्क नंबर प्राप्त झाले त्यांना दुरध्वणीवरून संपर्क करून व संदेश पाठवून संबंधीतांना उपस्थित राहण्याबाबत दि.१९.१२.२०११ रोजी दुपारी ०४.०० ची वेळ देण्यात आली. मुलाखत प्रक्रिया अखेर मुलाखतीस एकुण ६६७ उमेदवार उपस्थित झाले. मुलाखत प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी दि.२६.१२.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

सचिव जिल्हा निवड समिती तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद नांदेड

अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी नांदेड